# चाणक्य मंडल परिवार

प्रश्नपुस्तिका क्रमांक CMPT003

**BOOKLET No.**

पेपर 3

एकूण प्रश्न : 100

वेळ : 1.30 (दीड) तास

## GS II : पॉलिटी

एकूण गुण : 100

### सूचना

(1) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

(2) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

परीक्षा-क्रमांक

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

(3) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनात बॉलपेनने लिहावा.

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे.**

(5) **ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत.

(8) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी एक तृतीयांश गुण वजा करण्यात येतील''.**

(9) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे.

*****

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

चाणक्य मंडल परिवार

1. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) घटनेच्या भाग VI मध्ये कलम 124 ते 147 मध्ये सर्वोच्च न्यायालयासंबंधी तरतुदी देण्यात आलेल्या आहेत.

(ब) सर्वोच्च न्यायालयाच्या कामकाजाला 26 जानेवारी 1950 ला सुरुवात झाली.

(क) 1919 च्या कायद्यान्वये स्थापन केलेल्या भारतीय संघराज्य न्यायालयाची जागा सर्वोच्च न्यायालयाने घेतली.

बरोबर कथने निवडा.

(1) फक्त अ
(2) वरीलपैकी सर्व
(3) वरीलपैकी कोणतेही नाही
(4) फक्त अ आणि ब

---

2. खालीलपैकी योग्य विधाने ओळखा.

(अ) उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या वयासंबंधी विवाद उत्पन्न झाल्यास राज्यपालांचा निर्णय अंतिम असतो.

(ब) उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या वयासंबंधी विवाद उत्पन्न झाल्यास राष्ट्रपतींचा निर्णय अंतिम असतो.

(क) उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या वयासंबंधी विवाद उत्पन्न झाल्यास सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय अंतिम असतो.

(1) फक्त क
(2) फक्त अ
(3) फक्त ब
(4) वरीलपैकी नाही

---

3. अयोग्य विधाने ओळखा.

(अ) फझल अली आयोगाने 4 विभागातील प्रांतांची मांडणी बदलून 16 राज्ये व 3 केंद्रशासित प्रदेशांची निर्मिती करावी अशी शिफारस केली होती.

(ब) राज्य पुनर्रचना कायद्यान्वये 13 राज्ये व 5 केंद्रशासित प्रदेश 1 नोव्हेंबर 1956 ला अस्तित्वात आले.

(1) फक्त अ
(2) फक्त ब
(3) दोन्ही अ आणि ब
(4) दोन्ही नाही

---

4. खालीलपैकी कोणते विषय राज्यसूचीमध्ये समाविष्ट नाहीत?

(अ) सार्वजनिक आरोग्य

(ब) उद्योग

(क) वाहनकर

(ड) मत्स्यउद्योग

(1) वरीलपैकी सर्व
(2) कोणतेही नाही
(3) फक्त अ, ब, क
(4) अ, क, ड



चाणक्य मंडल परिवार

5. खालीलपैकी कोणत्या राष्ट्रपतींनी पॉकेट व्हेटोचा वापर केला?

(1) प्रतिभाताई पाटील
(2) ग्यानी झैलसिंग
(3) राजेंद्रप्रसाद
(4) व्ही. व्ही. गिरी

6. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) 69 व्या घटनादुरुस्तीने राष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत दिल्ली व पुदुच्चेरीच्या विधानसभा सदस्यांना मतदानाचा हक्क मिळाला.

(ब) सर्वात कमी काळ राष्ट्रपती म्हणून झाकीर हुसैन यांनी काम पाहिले.

(क) राष्ट्रपतीपदी एकमेव बिनविरोध निवडून आलेली व्यक्ती म्हणजे नीलम संजीव रेड्डी होय.

योग्य विधाने निवडा.

(1) अ आणि ब
(2) ब आणि क
(3) अ आणि क
(4) वरील सर्व

7. राष्ट्रपतीपदावरील व्यक्ती गैरहजेरी, आजारपण किंवा इतर कारणांमुळे जर कार्य करू शकत नसेल तर अशा वेळी उपराष्ट्रपती जास्तीत जास्त किती काळ राष्ट्रपती पदावर राहू शकतात?

(1) 6 महिने (2) उर्वरित काळ
(3) 1 वर्ष (4) यापैकी नाही

8. योग्य जोड्या जुळवा.

| तरतूद | कलम |
|---|---|
| (अ) राज्यपालांनी राष्ट्रपतींसाठी विधेयक राखून ठेवणे | (i) 174 |
| (ब) राज्य विधीमंडळ अधिवेशन | (ii) 201 |
| (क) राज्यपालांची शपथ | (iii) 156 |
| (ड) राज्यपालांचा कार्यकाळ | (iv) 159 |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | iii | iv | i | ii |
| (2) | iv | ii | iii | i |
| (3) | ii | i | iv | iii |
| (4) | i | ii | iii | iv |

9. चुकीची जोडी ओळखा.

(1) 17 वा लोकसभा हंगामी सभापती (speaker Pro Tem) - विरेंद्रकुमार
(2) 17 वा लोकसभा स्पीकर - ओम बिर्ला
(3) राज्यसभा नेते - थावरचंद गेहलोत
(4) यापैकी नाही

---

10. योग्य जोडी ओळखा.

विशेष दर्जा असलेले राज्य : कलम

(1) मिझोराम - 371 B
(2) अरुणाचल प्रदेश - 317 H
(3) आसाम - 371 G
(4) सिक्कीम - 371 E

---

11. जम्मू व काश्मीर राज्याचे कायदेमंडळ तेथील स्थायी रहिवाशांना पुढील कोणत्या बाबतीत विशेष अधिकार आणि सुविधा देते?

खाली दिलेल्या पर्यायातून अचूक पर्याय ओळखा.

(अ) राज्यसरकारमधील रोजगार
(ब) राज्यातील निवास
(क) स्थावर मालमत्तेचे अधिग्रहण
(ड) शिष्यवृत्तीचा अधिकार
(इ) ऐतिहासिक वारसा स्थळांमध्ये प्रवेश

(1) अ, ब, क, ड, इ
(2) अ, ब, क
(3) अ, ब, इ
(4) अ, ब, क, ड

---

12. एकूण किती राज्ये व केंद्रशासित प्रदेशात लोकसभेची एकच जागा आहे?

(1) 3, 6
(2) 6, 3
(3) 4, 5
(4) 5, 4

---

13. विधेयक राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवण्याबाबत राज्यपालांच्या अधिकारासंदर्भात कोणती विधाने अयोग्य आहेत?

(अ) कलम 201 मध्ये यासंबंधी तरतूदी आहेत.
(ब) हा राज्यपालांचा विवेकाधिकार आहे.
(क) विधेयक राष्ट्रपतींच्या विचारार्थ राखून ठेवण्याबाबतची तरतूद ही जम्मू काश्मीर राज्यास देखील लागू आहे.

(1) अ, ब
(2) ब, क
(3) अ, क
(4) अ, ब, क



चाणक्य मंडल परिवार

14. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) छत्तीसगढ, उत्तराखंड, गोवा राज्यांची निर्मिती 2000 साली झाली.

(ब) अरुणाचल प्रदेश, मिझोराम राज्यनिर्मिती 1987 साली झाली.

(क) मणिपूर, त्रिपूरा, मेघालय या राज्यांची निर्मिती 1972 साली झाली.

अयोग्य विधाने ओळखा.

(1) फक्त अ
(2) फक्त ब
(3) अ व ब
(4) सर्व

---

15. लोकसभा व राज्यसभा यांच्या विरोधी पक्षनेते पदाला वैधानिक दर्जा (Statutory Status) पुढीलपैकी कोणत्या वर्षी (अनुक्रमे) मिळाला होता?

(1) 1977, 1978
(2) 1975, 1977
(3) 1977, 1977
(4) 1978, 1985

---

16. भारताचा प्रदेश म्हणजे त्यावेळी अनुच्छेद 1 मध्ये नोंदवल्यानुसार पहिल्या अनुसूचित उल्लेख केलेला प्रदेश होय. असा महत्त्वाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने पुढीलपैकी कोणत्या खटल्यात दिलेला आहे?

(1) बेरूबरी युनियन खटला 1960
(2) बाबलाल वि. स्टेट ऑफ बॉम्बे खटला 1960
(3) मस्थान साहिब वि. चीफ कमिशनर खटला 1962
(4) वरीलपैकी कोणीही नाही

---

17. पक्ष प्रतोद (Whip) हे पद भारतीय व्यवस्थेत पुढीलपैकी कुठे अंतर्भूत करण्यात आलेले आहे?

(अ) संसद सभागृहाची नियमावली (Rules of the House)

(ब) संसदीय संविधी (Parliamentary Statute)

(क) संसदीय शासन प्रणालीचे संकेत (Conventions of the Parliamentary Government)

(1) फक्त अ
(2) फक्त ब
(3) फक्त क
(4) वरीलपैकी सर्व

---

18. पुढे दिलेल्या विधानांपैकी चुकीची विधाने ओळखा.

(अ) संघराज्य (Federation) ही संज्ञा भारतीय संविधानात केवळ अनुच्छेद 1 मध्ये उल्लेखली आहे, ती इतरत्र कुठेही आढळत नाही.

(ब) भारतीय भूभागाचा मोठा आकार हे भारतीय संविधानात व एकंदरीतच भारतीय शासनपद्धतीत संघराज्यात्मक व्यवस्थेचा स्वीकार महत्त्वाचे कारण आहे.

(1) फक्त अ
(2) फक्त ब
(3) अ, ब दोन्ही
(4) वरीलपैकी नाही

19. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) राज्यांच्या विधानपरिषद (State Legislative Council) सदस्यांचा कार्यकाल 6 वर्षे असावा ही तरतूद राज्य विधानसभेने केली आहे.

(ब) राज्यांच्या विधानपरिषद सदस्यांचा कार्यकाल 6 वर्षे असावा ही तरतूद संसदेने केली आहे.

(क) महाराष्ट्र विधानसभेतील अनुसूचित जातींसाठी (Scheduled Caste) 29 व अनुसूचित जमातींसाठी (Scheduled Tribe) 25 जागा आरक्षित आहेत.

(ड) महाराष्ट्र विधानसभेतील अनुसूचित जातींसाठी (Scheduled Caste) 27 व अनुसूचित जमातींसाठी (Scheduled Tribe) 25 जागा आरक्षित आहेत.

अयोग्य विधाने ओळखा.

(1) अ, ब
(2) ब, क
(3) अ, ड
(4) अ, क

---

20. पुढे दिलेल्या विधानांपैकी सत्य विधाने ओळखा.

(अ) राज्यसभेत प्रलंबित (Pending) असलेले लोकसभेने पारित न केलेले विधेयक लोकसभा विसर्जित झाल्यास व्यपगत (Lapse) होते.

(ब) दोन्ही सभागृहांकडून पारित झालेले परंतु राष्ट्रपतींची मंजूरी न मिळालेले विधेयक लोकसभा विसर्जित झाल्यास व्यपगत होते.

(1) फक्त अ
(2) फक्त ब
(3) दोन्ही अ व ब
(4) दोन्ही नाही

---

21. _______ अनुच्छेद तरतुदीनुसार राज्याचे मंत्रीमंडळ विधानसभेला सामूहिकरित्या जबाबदार असते.

(1) कलम 75
(2) कलम 164
(3) कलम 76
(4) कलम 163

---

22. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) 2010 साली स्थापन केलेल्या वंशधारा जलविवाद लवादात आंध्रप्रदेश, ओडिसा, तमिळनाडू राज्यांचा समावेश आहे.

(ब) 2009 साली स्थापन केलेल्या महादयी जलविवाद लवादात गोवा, महाराष्ट्र, कर्नाटक यांचा समावेश आहे.

(क) कावेरी नदीसाठी 1990 व 2004 साली जलविवाद लवादे (Tribunals) स्थापन करण्यात आले.

योग्य विधाने ओळखा.

(1) फक्त क
(2) अ आणि ब
(3) फक्त ब
(4) ब आणि क



चाणक्य मंडल परिवार

23. महालेखापरिक्षक (Comptroller and Auditor General) पद व कार्यालय यावर पॉल ॲप्लेबी याने काही टीका केली आहे, त्या टीकेत कशाकशाचा समावेश होतो?

(अ) त्याचे कार्यालय वासाहतिक परंपरेतून निर्माण झाले आहे.

(ब) लोकपालांना प्रशासनाबाबत फारसे माहित नसते.

(क) लेखापरिक्षणांचा नकारात्मक परिणाम होतो.

(1) फक्त ब (2) फक्त क
(3) अ व ब (4) अ, ब, क सर्व

---

24. जनहितार्थ याचिका (Public Interest Litigation) बाबत खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

(अ) असे म्हटले जाते की जनहितार्थ याचिकेने न्यायपालिकेचे लोकशाहीकरण केले.

(ब) जनहितार्थ याचिकेने भ्रष्टाचारमुक्त प्रशासन देण्याचा एक प्रयत्न केला आहे.

(1) फक्त अ (2) फक्त ब
(3) दोन्ही नाही (4) अ, ब दोन्ही

---

25. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) 1971 मध्ये महाराष्ट्रात लोकायुक्त संस्थेची स्थापना करण्यात आली.

(ब) लोकायुक्तांची नेमणूक राज्यपाल करतात.

(क) लोकायुक्त पदाचा कार्यकाळ 5 वर्षांचा आहे.

बरोबर विधाने कोणती?

(1) फक्त अ, ब (2) फक्त ब, क
(3) यापैकी नाही (4) वरीलपैकी सर्व

---

26. खालीलपैकी कोणते विधान बरोबर नाही?

(1) भारतात तीन वित्तीय स्थायी समित्या आहेत.
(2) अंदाजसमिती (Estimates Committee) 1950 मध्ये जॉन मथाई यांच्या शिफारशीवरून अस्तित्वात आली.
(3) अंदाज समितीत केवळ लोकसभेतील 30 पेक्षा जास्त नाहीत इतके सदस्य असतात.
(4) अंदाज समितीच्या अध्यक्षांची नेमणूक सभापतीकडून होते व ते नेहमीच विरोधी पक्षातील असतात.

---

27. लोकलेखा समितीची (Public Account Committee) पद्धत या देशापासून घेतली आहे.

(अ) अमेरिका (ब) फ्रान्स
(क) ग्रेट ब्रिटन (ड) चीन

(1) फक्त ड (2) फक्त क
(3) ब व क दोन्ही (4) फक्त अ

---



चाणक्य मंडल परिवार

28.

| पद | वरिष्ठत्व (Order of Precedence) |
|---|---|
| (अ) पंतप्रधान | (i) 7A |
| (ब) भारतरत्न विभूषित | (ii) 9 |
| (क) सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश | (iii) 5 |
| (ड) माजी राष्ट्रपती | (iv) 3 |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | ii | iii | iv | i |
| (2) | i | iv | iii | ii |
| (3) | iv | i | ii | iii |
| (4) | ii | iv | iii | i |

---

29. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) अंदाज समितीची स्थापना जॉन मथाई यांच्या शिफारशीनुसार 1921 मध्ये झाली.

(ब) या समितीला सतत मितव्ययिता समिती म्हणतात. (Continuous Economy Committee)

(क) या समितीतील सर्व सदस्य लोकसभेकडून निवडले जातात.

(ड) मंत्री या समितीचा सदस्य म्हणून निवडून येऊ शकतो.

अयोग्य विधाने ओळखा.

(1) अ, ब

(2) ब, क

(3) क, ड

(4) अ, ड

---

30. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) 1 जून 2015 रोजी निती आयोगाची स्थापना झाली.

(ब) निती आयोगाचे पूर्ण रूप (NITI) Full Form - National Institution for Transforming India असे आहे.

(क) निती आयोग TOP Down मॉडेल अवलंबतो.

(ड) National Institute of Labour Economics Research and Development हे निती आयोगाच्या अधिनस्थ कार्य करते. (Subordinate office)

योग्य विधाने ओळखा.

(1) अ आणि ब

(2) ब आणि क

(3) क आणि ड

(4) ब आणि ड



चाणक्य मंडल परिवार

31. खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे?

(अ) संसदेच्या दोन्ही सभागृहाच्या संयुक्त बैठकीची (Joint Sitting) तरतूद केवळ सर्वसाधारण विधेयके (Ordinary Bill) व वित्त विधेयकांसाठी (Finance Bill) लागू आहे, अर्थ विधेयकांसाठी (Money Bill) नाही.

(ब) लोकसभा विसर्जित झाल्यामुळे विवादीत विधेयक लोप (Lapse) पावले असेल तर संयुक्त बैठक बोलविता येते.

(क) राष्ट्रपतीने संयुक्त बैठक बोलविण्याची इच्छा सूचित केल्यानंतर लोकसभा विसर्जित झाली असेल तर संयुक्त बैठक बोलवता येते.

(1) अ (2) ब
(3) क (4) वरीलपैकी एकही नाही

---

32. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) राज्यघटनेमध्ये राज्यपालपदासाठी असलेल्या विविध अटींमध्ये त्याच्या वेतन, भत्ते व विषेश अधिकारांची जबाबदारी संसदेवर टाकण्यात आली आहे.

(ब) तसेच एक व्यक्ती दोन / अधिक राज्यांची राज्यपाल म्हणून नियुक्ती केली जाते त्यावेळी त्यास द्यावयाचे वेतन, भत्ते यांची राज्यातील विभागणी त्या राज्यातील विधीमंडळे आपआपसात चर्चा करून ठरवतात.

वरीलपैकी कोणते विधान / विधाने बरोबर आहेत?

(1) फक्त अ
(2) फक्त ब
(3) अ व ब
(4) दोन्ही चूक

---

33. खालील विधाने विचारात घ्या.

(अ) घटनेच्या भाग 1 मध्ये कलम 153 ते 167 कार्यकारी विभागाशी (Executive) संबंधित असून राज्यपालपदाचा त्याअंतर्गत समावेश होतो.

(ब) सामान्यतः प्रत्येक राज्याला एक राज्यपाल असतो; पण 6 वी घटनादुरुस्ती अधिनियम 1956 अन्वये दोन / अधिक राज्यांना एक व्यक्ती राज्यपाल म्हणून नियुक्त होऊ शकते.

(क) सन 1979 च्या घटनादुरुस्ती नुसार राज्यपालाचे पद हे केंद्र सरकारच्या नोकरीतील पद नसून ते एक स्वतंत्र घटनात्मक पद आहे असे घोषित करण्यात आले आहे.

(ड) भारतात राज्याचा गव्हर्नर थेट निवडला जाण्याची कॅनेडियन पद्धत न स्विकारता संविधान सभेने अमेरिकन पद्धतीचा स्वीकार केला आहे.

वरीलपैकी कोणती विधाने अयोग्य आहेत?

(1) फक्त ब आणि ड (2) अ, ब आणि क
(3) ब, क, ड (4) वरीलपैकी सर्व



चाणक्य मंडल परिवार

34. योग्य कथने / कथन ओळखा.

(अ) राज्य विधीमंडळाचा सदस्य नसलेल्या व्यक्तीची मुख्यमंत्रीपदी नियुक्ती करता येणे शक्य आहे, परंतु पुढील सहा महिन्यांच्या काळात त्या व्यक्तीस विधिमंडळाच्या कोणत्याही एका सभागृहातून निवडून येणे गरजेचे असते.

(ब) विधीमंडळाच्या कोणत्याही सभागृहाचे सदस्य नसताना महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणारे उद्धव ठाकरे हे सहावे मुख्यमंत्री ठरले आहेत.

(1) फक्त अ
(2) फक्त ब
(3) दोन्ही योग्य
(4) दोन्ही अयोग्य

---

35. महाराष्ट्र राज्य निर्मिती संदर्भात खालील विधाने विचारात घ्या. अयोग्य विधानाचा पर्याय निवडा.

(अ) मुंबईसह महाराष्ट्राच्या मागणीसाठी 30 व्या बेळगाव साहित्य संमेलनात 12 मे 1946 रोजी संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन करण्यात आली.

(ब) 28 नोव्हेंबर 1949 रोजी प्र. क अत्रे आणि आर. डी. भंडारे यांनी मुंबई महानगरपालिकेत संयुक्त महाराष्ट्राचा ठराव मांडला जो 35 विरुद्ध 50 अशी मते पडून मंजूर होऊ शकला नाही.

(क) 1953 साली यशवंतराव मोहिते यांनी विधानसभेत संयुक्त महाराष्ट्राच्या एकीकरणाचा ठराव मांडला तो मंजूर करण्यात आला.

(1) अ, क
(2) ब आणि क
(3) अ, ब आणि क
(4) वरीलपैकी एकही नाही

---

36. भारतीय राज्यघटनेच्या खालीलपैकी कोणत्या कलमात राज्यपालाला माहिती देण्यासंदर्भांत मुख्यमंत्र्यांची कर्तव्ये नमूद करण्यात आलेली आहेत?

(1) कलम 166
(2) कलम 167
(3) कलम 168
(4) वरीलपैकी एकही नाही

---

37. रेग्यूलेटींग ॲक्ट 1773 बाबत खालील विधानांचा विचार करा, चुकीचे विधान निवडा.

(1) या कायद्यान्वये कंपनीला राजकीय व प्रशासकीय कामाची मान्यता मिळाली.
(2) बंगालच्या गव्हर्नरला गर्व्हनर जनरल असे संबोधण्यात येऊ लागले.
(3) गर्व्हनर जनरलच्या मदतीला सहा सदस्यांचे कार्यकारी मंडळ नियुक्त केले गेले.
(4) कोलकाता येथील सर्वोच्च न्यायालयात 1 मुख्य न्यायाधीश व इतर 3 न्यायाधीशांची नियुक्ती झाली.



चाणक्य मंडल परिवार

38. पिट्स इंडिया ॲक्ट (Pitts India Act) 1784 चा विचार करा व चुकीचे विधान निवडा.

(अ) तत्कालिन ब्रिटनचे भारतमंत्री विल्यम पीट यांनी हे विधेयक मांडले.

(ब) राजकीय कामावर लक्ष ठेवण्यासाठी बोर्ड ऑफ कंट्रोल ची नेमणूक करण्यात आली. यामध्ये 6 सदस्यांचा समावेश करण्यात आला.

(क) व्यापारी कामांवर लक्ष ठेवण्याठी कोर्ट ऑफ डिरेक्टर्सची नेमणूक केली गेली.

(ड) गव्हर्नर जनरलच्या कार्यकारी मंडळातील सदस्यांची संख्या 3 वरून 4 करण्यात आली.

(1) अ व ड चूक
(2) ब व क चूक
(3) सर्व चूक
(4) सर्व बरोबर

---

39. चार्टर ॲक्ट 1813 बाबत खालील विधानांचा विचार करा व चुकीचे विधान निवडा.

(अ) कंपनीचा भारताशी व्यापार करण्याचा एकाधिकार रद्द करण्यात आला. पण चहाच्या व्यापारात तो कायम ठेवण्यात आला.

(ब) भारतात शिक्षण प्रसारासाठी दरवर्षी 1 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली.

(क) कंपनीचा चीनशी व्यापार करण्याचा एकाधिकार रद्द करण्यात आला.

(ड) बंगालच्या गव्हर्नर जनरलला गर्व्हनर जनरल असे नामाभिधान दिले.

(1) अ व ब चूक
(2) अ, क व ड चूक
(3) सर्व चूक
(4) सर्व बरोबर

---

40. महाराष्ट्र राज्य निर्मिती संदर्भात 28 सप्टेबर 1953 रोजी झालेल्या नागपूर करारात खालीलपैकी कोणत्या तरतूदी समाविष्ट नव्हत्या?

(अ) उच्च न्यायालय मुंबई व नागपूर येथे असावे.

(ब) नागपूर ही महाराष्ट्राची उपराजधानी असावी.

(क) लोकसंख्येनुसार प्रत्येक विभागाला शासनात स्थान असेल.

(ड) सर्व सलग मराठी प्रदेश नव्या राज्यात समाविष्ट होण्यासाठी खेडे हा घटक मानला जावा.

(1) क व ड
(2) वरीलपैकी एकही घटक समाविष्ट नाही
(3) फक्त ड
(4) वरीलपैकी सर्व घटक समाविष्ट

---

41. भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न सोडवण्यासाठी काँग्रेसच्या जयपूर अधिवेशनात खालीलपैकी कोणत्या समितीची स्थापना करण्यात आली?

(1) दार कमिशन
(2) जेव्हीपी कमिटी
(3) फजल अली कमिटी
(4) संयुक्त महाराष्ट्र समिती



चाणक्य मंडल परिवार

42. 1793 ते 1834 दरम्यान केंद्रीय सचिवालय खालीलपैकी कोणत्या चार मुख्य विभागात विभागलेले होते?

(अ) सर्वसाधारण विभाग

(ब) सार्वजनिक विभाग (Public)

(क) न्यायिक विभाग (Judicial)

(ड) वाणिज्य/व्यावसायिक विभाग (Commercial)

(इ) गुप्तहेर विभाग

(ई) महसूल विभाग (Revenue)

(1) अ, क, इ, ई
(2) अ, ब, ड, ई
(3) अ, ड, क, ई
(4) अ, क, ड, ई

---

43. 1792 मध्ये कॉर्नवॉलिसने पोलिस प्रशासनाचा कारभार सुधारण्याच्या उद्देशाने खालीलपैकी कोणती / कोणत्या सुधारणा केल्या?

(1) ठाणे या एककात जिल्ह्याचे विभाजन करून प्रत्येक ठाण्यावर मुख्य अधिकारी म्हणून दरोगा नियुक्त केला.

(2) चौकीदार तसेच इतर स्थानिक पोलिस हे दरोग्यास त्याच्या कामात सहाय्य करतील अशी व्यवस्था करण्यात आली.

(3) 1 व 2 दोन्ही

(4) एकही नाही

---

44. 94 व्या घटनादुरुस्ती अधिनियम 2006 अन्वये खालीलपैकी कोणत्या राज्यांमध्ये आदिवासी कल्याणासाठी एक मंत्री असावा अशी तरतूद करण्यात आली?

(अ) बिहार
(ब) छत्तीसगढ
(क) मध्यप्रदेश
(ड) ओडिशा
(इ) झारखंड

(1) ब आणि इ
(2) क, ड आणि इ
(3) ब, क, ड, इ
(4) अ, ब, क

---

45. महाराष्ट्र राज्य निर्मिती (1 मे 1960) नंतर महाराष्ट्रातील विविध मुख्यमंत्र्यांच्या कारकिर्दीत विकासकार्यासंबंधित योग्य विधाने ओळखा.

(अ) ओझर येथील मिग विमानांचा कारखाना व वरणगाव, मंजरा, भद्रावती येथे संरक्षण साहित्यांचे कारखाने मारोतराव कन्नमवार यांच्या कारकिर्दीत उभारण्यात आले.

(ब) पाणी अडवा, पाणी जिरवा आणि रोजगार हमी योजना वसंतराव नाईक मुख्यमंत्रीपदी असताना अस्तित्वात आल्या.

(क) नाशिक व अमरावती या दोन प्रशासकीय विभागांची निर्मिती बॅ. अ. रे. अंतुले यांच्या कारकिर्दीत झाली.

(1) अ आणि क
(2) फक्त ब योग्य
(3) ब आणि क
(4) वरील सर्व योग्य



चाणक्य मंडल परिवार

46. महाराष्ट्राचे राज्यपाल व त्यांचा कार्यकाळ यांच्यातील अयोग्य जोडी ओळखा.

| अ गट | ब गट |
|---|---|
| (अ) विजयालक्ष्मी पंडित = | 1962 ते 1967 |
| (ब) सादिक अली = | 1977 ते 1981 |
| (क) शंकर दयाल शर्मा = | 1986 ते 1989 |
| (ड) विद्यासागर राव = | 2014 ते 2019 |

(1) केवळ अ (2) अ, ब आणि क
(3) अ आणि ब (4) वरीलपैकी सर्व

---

47. खालील विधानांचा विचार करून अचूक विधान निवडा.

(1) कर्नाटक राज्य विधानसभेच्या 224 जागा असून विधान परिषदेच्या 75 जागा आहेत, त्यापैकी 36 जागा अनुसूचित जातींसाठी (Scheduled Caste) तर 15 जागा अनुसूचित जमातींसाठी (Scheduled Tribe) राखीव आहेत.
(2) तेलंगणा राज्याच्या विधानसभेत 119 जागा असून विधान परिषदेच्या 40 जाग आहेत, त्यापैकी 9 जागा अनुसूचित जमातींसाठी (Scheduled Tribe) तर 14 जागा अनुसूचित जातींसाठी (Scheduled Caste)राखीव आहेत.
(3) दोन्ही अचूक
(4) दोन्ही चूक

---

48. खालील राज्यांचा त्यातील अनुसूचित जातींकरीता राखीव जागांचा उतरता क्रम लावा.

(अ) तामिळनाडू
(ब) राजस्थान
(क) केरळ
(ड) छत्तीसगढ
(1) अ, ब, क, ड
(2) ब, अ, क, ड
(3) ड, ब, क, अ
(4) ब, अ, ड, क

---

49. योग्य विधाने निवडा.

(अ) विधानपरिषदेतील एकूण सदस्यसंख्येपैकी एक तृतीयांश सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सदस्यांकडून निवडले जातात.
(ब) शिक्षक मतदारसंघातून एक बारांश सदस्यांची निवड केली जाते.
(1) फक्त अ (2) फक्त ब
(3) दोन्ही अयोग्य (4) दोन्ही योग्य



चाणक्य मंडल परिवार

50. संसद (Parliament) आणि राज्य विधीमंडळ (State Legislature) यांच्यातील कायदेविषयक प्रक्रियेची तुलना खालीलपैकी कोणत्या विधानात योग्य प्रकारे नमूद केलेली आहे ते ओळखा.

(1) संसदेमध्ये (Parliament) सामान्य विधेयक प्रथम सभागृहातून संमत केल्यानंतर व्दितीय गृहासाठी 6 महिने अवधी असतो तर विधीमंडळात अशा प्रकारची कोंडी निर्माण होण्याआधी द्वितीय सभागृहास 2 महिन्यांचा अवधी मिळतो.

(2) धन विधेयक फक्त लोकसभेत सादर करता येते परंतु राज्य विधीमंडळाच्या बाबतीत कोणत्याही सभागृहात धन विधेयक सादर करता येऊ शकते.

(3) एखाद्या विधेयकासंदर्भात कोंडीची परिस्थिती निर्माण झाल्यास संसद आणि राज्य विधीमंडळे संयुक्त बैठक बोलावून अशा प्रकारची कोंडी सोडवतात.

(4) वरील सर्व विधाने अयोग्य.

---

51. राज्य विधीमंडळाचे सचिवालय खालीलपैकी कोणत्या कलमात नमूद आहे?

(1) कलम 186
(2) कलम 187
(3) कलम 182
(4) कलम 191

---

52. चार्टर ॲक्ट 1833 बाबत खालील विधानांचा विचार करा व अचूक विधाने ओळखा:

(1) या कायद्यानुसार बंगालच्या गव्हर्नर जनरल ला भारताचा गव्हर्नर जनरल असे म्हणण्यात आले.

(2) ईस्ट इंडिया कंपनीचे व्यापारी संस्था म्हणून कार्य समाप्त झाले.

(3) दोन्ही अचूक.

(4) दोन्ही चूक.

---

53. भारत सरकार कायदा 1858 बाबत खालील विधानांचा विचार करा व अचूक विधान/ने निवडा.

(1) भारताचा कारभार पाहण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटमध्ये भारत मंत्री या पदाची निर्मिती करण्यात आली.

(2) पहिले भारत मंत्री एडवर्ड स्टॅनले हे होते.

(3) एक व दोन दोन्ही अचूक

(4) दोन्ही चूक

---

54. अयोग्य विधानाचा पर्याय निवडा:

(1) गुप्तकाळात आजच्या जिल्ह्याला समांतर प्रदेशाचे विभाजन **विषय** या प्रदेशात केले जायचे व त्याच्या प्रमुखास विषयापती म्हणत, जे पद आजच्या जिल्हाधिकारी पदास समान म्हणता येईल.

(2) मुघल काळात अमलगुजर नावाचा सरकारी महसूल अधिकारी आजच्या जिल्हाधिकाऱ्याला समान होता.

(3) ब्रिटिश काळात 1772 साली वॉरेन हेस्टींग याने बंगालमधील पर्यवेक्षक हे पद रद्द करून त्या जागी कलेक्टर हे नवे पद निर्माण केले.

(4) 1793 साली कॉर्नवॉलिसने जिल्हाधिकाऱ्यांचे महसूल आणि न्यायिक अधिकार वेगळे केले.



चाणक्य मंडल परिवार

55. राज्य सचिवालया (State Secratriate) संदर्भात खालील विधानांचा विचार करा व योग्य पर्याय निवडा:

(1) राज्य सचिवालय हे प्रत्येक राज्याचे प्रशासकीय एकक असते.

(2) मुख्य सचिव हा पूर्ण राज्य सचिवालयाच्या प्रमुख असतो.

(3) मुख्य सचिव या पदाची निर्मिती 1799 साली वेलस्ली यांनी केली.

(4) वरील सर्व विधाने योग्य.

---

56. राज्याच्या मुख्य सचिवा (Chief Secretary) संदर्भात योग्य विधानांचा पर्याय निवडा.

(अ) मुख्य सचिवांना राज्यासाठी विकास आयुक्त म्हणून ओळखले जाते.

(ब) कोणत्याही राज्यात मुख्य सचिवाची नियुक्ती त्या राज्याच्या राज्यपालांमार्फत केली जाते.

(क) राज्यातील मुख्य सचिवांचा कार्यकाळ निश्चित (tenure fix) असतो.

(ड) राज्यसचिव हा मंत्री परिषदेचा पदसिद्ध सचिव म्हणून कार्य करतो.

(1) अ आणि ड
(2) अ, ब आणि ड
(3) अ, ब आणि क
(4) वरील सर्व योग्य.

---

57. महाराष्ट्र राज्य विधानपरिषदेसंदर्भात अयोग्य विधानांचा पर्याय निवडा.

(अ) भारत सरकार कायदा 1935 अंतर्गत मुंबई विधान परिषदेची स्थापना झाली.

(ब) 20 जुलै 1937 रोजी मुंबई येथील कौन्सील हॉलमध्ये दुपारी दोन वाजता विधान परिषदेची पहिली बैठक पार पडली.

(क) 1939 ते 1946 पर्यंत विधान परिषदेचे कार्य निलंबित करण्यात आले होते.

(ड) विधानपरिषदेच्या स्थापनेच्या वेळी 1937 मध्ये सदस्य संख्या 39 होती. द्विभाषिक मुंबई राज्यात 1957 मध्ये ती 108 झाली, तर महाराष्ट्र राज्यस्थापनेपासून आतापर्यंत ती 78 इतकी आहे.

(1) ब आणि क
(2) अ, ब आणि ड
(3) ब आणि ड
(4) सर्व विधाने योग्य आहेत

---

58. योग्य विधाने ओळखा:

(अ) घटनेतील कलम 170 अन्वये विधानसभांची रचना सांगितली आहे.

(ब) विधानसभेची कमाल सदस्य संख्या 500 व किमान 40 इतकी निश्चित करण्यात आलेली आहे.

(क) कलम 178 अन्वये विधानसभेसाठी अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाची तरतुद केली आहे.

(ड) 1935 कायद्यानुसार अस्तित्वात आलेल्या महाराष्ट्र विधानसभेत 175 सदस्य होते.

(1) वरील सर्व योग्य
(2) वरील सर्व अयोग्य
(3) अ, क, ड योग्य
(4) अ आणि क योग्य

59. योग्य विधाने ओळखा :

(1) कलम 164 1(A) अन्वये 91 व्या घटनादुरुस्तीने (2003) राज्य मंत्रिमंडळातील मंत्र्यांची संख्या मुख्यमंत्र्यांसह एकूण विधानसभा सदस्यांच्या 15 टक्क्यांपेक्षा अधिक असू नये, परंतु मुख्यमंत्र्यांसह राज्यातील मंत्र्यांची संख्या एकूण 12 पेक्षा कमी असणार नाही असे निश्चित करण्यात आलेले आहे.

(2) कलम 164 1(B) अन्वये 91 व्या घटनादुरुस्ती ने (2003) राज्यविधीमंडळाचा कोणताही सदस्य जर पक्षांतर बंदी कायद्याअंतर्गत सदस्य म्हणून अपात्र ठरविण्यात आल्यास तो मंत्री होण्यास सुद्धा पात्र असतो.

(3) 1 आणि 2 अयोग्य

(4) 1 आणि 2 योग्य

---

60. मुख्य सचिव आणि केंद्रीय मंत्रिमंडळ सचिव यांच्या बाबतीत खालीलपैकी कोणता पर्याय योग्य आहे?

(अ) दोघेही आपापल्या कार्यकारी प्रमुखांचे प्रमुख सल्लागार आहेत.

(ब) दोन्ही पदांचा मूळ उगम केंद्रीय पातळीवर झालेला आहे.

(क) दोघांचीही कामे व अधिकार समान आहेत.

(1) अ योग्य (2) अ आणि ब योग्य

(3) ब आणि क योग्य (4) सर्व योग्य

---

61.

(अ) लोकशाही समाजवादी (Democratic Socialism) प्रणाली दारिद्र्य अज्ञान अनारोग्य आणि संधीतील असमानता दूर करते.

(ब) भारतीय समाजवाद हा मार्क्सवाद (Marxism) आणि गांधीवाद (Gandhism) यांचा मिलाफ असून गांधीवादी समाजवादाकडे अधिक चुकला आहे.

वरीलपैकी योग्य विधान/ने ओळखा.

(1) अ (2) ब

(3) वरीलपैकी दोन्ही (4) वरीलपैकी नाही

---

62. राज्यघटनेतील कलम 28 संदर्भात खालील विधानांचा विचार करा

(अ) राज्याकडून सहाय्य मिळणाऱ्या संस्थेमध्ये धार्मिक शिक्षणास परवानगी नसते.

(ब) राज्याने मान्यता दिलेल्या संस्थेमध्ये स्वच्छेनुसार धार्मिक शिक्षण घेण्यास परवानगी असते.

खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.

(1) फक्त अ योग्य

(2) फक्त ब योग्य

(3) दोन्ही योग्य

(4) दोन्ही अयोग्य



चाणक्य मंडल परिवार

63. खालीलपैकी कोणत्या बाबींमध्ये प्रभावी बहुमताची गरज असते (Effective Majority) ?

(अ) उपराष्ट्रपतींना पदावरून दूर करण्यासाठी राज्यसभेत

(ब) लोकसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना पदावरून दूर करण्यासाठी

(क) सर्वोच्च व उच्च न्यायालयातील न्यायाधीशांना पदावरून दूर करण्यासाठी

(ड) राज्य विधानसभेचे व विधानपरिषदेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना पदावरून दूर करण्यासाठी

(1) अ, ब, ड  (2) अ, ब, क
(3) ब, ड  (4) फक्त ब

---

64. राज्यघटनेतील कलम 22 संदर्भात खालीलपैकी योग्य विधान ओळखा

(1) सल्लागार समितीने पुरेशी कारणे नमूद केल्याशिवाय व्यक्तीला दोन महिन्यांपेक्षा जास्त काळ स्थानबद्धतेत ठेवता येत नाही.

(2) सल्लागार समितीमध्ये सर्वोच्च व उच्च न्यायालयातील न्यायाधीशांचा समावेश असतो.

(3) प्रतिबंधात्मक स्थानबद्धतेविषयी (Preventive Detention) कायदा करण्याचा अधिकार फक्त संसदेला आहे

(4) वरीलपैकी एकही नाही.

---

65.

(अ) जर मूलभूत हक्क आणि मार्गदर्शक तत्वे यामध्ये विरोध असेल तर मूलभूत हक्क श्रेष्ठ आहे असे सर्वोच्च न्यायालयाने चंपकम दोराई राजन खटल्यामध्ये (1951) म्हटले.

(ब) गोलकनाथ खटला (1967) मध्ये सर्वोच्च न्यायालयाने मूलभूत हक्क हे दैवी (Sacrosanct) असल्याने संसद मूलभूत हक्कांचा संकोच करू शकत नाही व ते हिरावून घेऊ शकत नाही असे म्हटले.

खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.

(1) अ बरोबर ब चूक  (2) अ चूक ब बरोबर
(3) दोन्ही बरोबर  (4) दोन्ही चूक

---

66. राज्यघटनेच्या मूलभूत संरचनेसंबंधी योग्य जोड्या ओळखा.

| **खटल्याचे नाव** | **मूळ संरचनेतील घटक** |
|---|---|
| (अ) केशवानंद भारती खटला (1973) | राज्यव्यवस्थेचे लोकशाही व प्रजासत्ताक स्वरूप (Republic & Democratic) |
| (ब) भीमसिंगजी खटला (1981) | कल्याणकारी राज्य (Welfare State) |
| (क) किहोतो होलोहोन खटला (1993) | मुक्त व न्याय निवडणूक (Free & Fair Election) |
| (ड) इंद्र सहानी खटला (1992) | कायद्याचे राज्य (Rule of Law) |

(1) अ, क  (2) अ, ड
(3) ब, क, ड  (4) वरीलपैकी सर्व



चाणक्य मंडल परिवार

67. भारतीय संविधानातील शोषणाविरुद्ध मूलभूत हक्कांमध्ये खालीलपैकी कोणते हक्क परिकल्पीत (Envisaged) आहेत ?

(अ) मानवी व्यापर व सक्तीचे श्रम यास प्रतिबंध.

(ब) अस्पृश्यता नष्ट करणे.

(क) अल्पसंख्याकांच्या हक्कांचे संरक्षण.

(ड) कारखाने, खाणी इ. मध्ये बालकांना कामास बंदी.

(1) अ, ब
(2) अ, क
(3) ब, क, ड
(4) अ, ड

---

68. संविधान सभेसंदर्भात खालीलपैकी अयोग्य विधान ओळखा.

(अ) संविधान सभेचे तात्पुरते अध्यक्ष म्हणून डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांच्या नावाची शिफारस आचार्य जे. बी. कृपलानी यांनी केली.

(ब) संविधान सभेचे अध्यक्ष म्हणून डॉ. राजेंद्रप्रसाद यांची शिफारस वल्लभभाई पटेल यांनी केली.

(क) पंडित जवाहरलाल नेहरू आणि मौलाना अबुल कलाम आझाद यांनी डॉ. राजेंद्र प्रसाद यांना अध्यक्षीय खुर्चीवर आसनस्थ केले.

(1) फक्त अ
(2) ब, क
(3) अ, क
(4) वरीलपैकी एकही नाही

---

69. कलम 31(A) पाच प्रकारच्या कायद्यांना न्यायालयीन आव्हानं पासून संरक्षण देते, खालीलपैकी कशाचा समावेश त्या पाच प्रकारांमध्ये होतो ?

(अ) राज्याने मालमत्ता अधिग्रहण करणे व त्यासंबंधीत अधिकार.

(ब) राज्याने मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे.

(क) निगमांचे एकीकरण (Amaglamation of Corporations)

(ड) निगमाच्या संचालकांचे आणि भागधारकांचे हक्क रद्द करणे आणि त्यात बदल करणे.

(इ) भाडेतत्त्वावरील खाणींचा करार रद्द करणे किंवा त्यात बदल करणे

(1) अ, ब, ड, इ
(2) ब, क, ड
(3) अ, क, ड, इ
(4) वरीलपैकी सर्व



चाणक्य मंडल परिवार

70. राज्यघटनेच्या मार्गदर्शक तत्वांसंदर्भात (Directive Principles of State Policy) खालीलपैकी योग्य विधाने ओळखा.

(अ) 42 वी घटनादुरुस्ती अधिनियम 1976 अन्वये पाच नवीन मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश करण्यात आला.

(ब) 44 व्या घटनादुरुस्ती अधिनियम 1978 ने एक मार्गदर्शक तत्त्वाचा नव्याने अंतर्भाव केला गेला.

(क) 86 व्या घटनादुरुस्ती कायदा 2002 नुसार कलम 45 मध्ये बदल करण्यात आला.

(ड) 97 व्या घटनादुरुस्ती अधिनियम 2011 द्वारे राज्यघटनेत 43-B हे नवे कलम अंतर्भूत करण्यात आले.

(1) अ, ब, ड
(2) क, ड
(3) ब, क, ड
(4) वरीलपैकी सर्व

---

71. योग्य जोड्या जुळवा

| प्राधिलेख (Writ) | वादाचे विषय |
|---|---|
| (अ) बंदी प्रत्यक्षीकरण (Habeous Corpus) | (i) विद्यापिठाच्या शिक्षकाची नेमणूक |
| (ब) परमादेश (Mandamus) | (ii) पालकांनी मुलाचा ताबा घेणे (Custody of Child by Parents) |
| (क) अधिकारपृच्छा (Quo-Warranto) | (iii) नैसर्गिक न्यायाचे उल्लंघन (Violation of Natural Justice) |
| (ड) उत्प्रेक्षण (Certioriori) | (iv) कर प्राधिकरणाद्वारे बेकायदेशीरपणे गोळा केलेल्या पैशाचा परतावा |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | i | iii | ii | iv |
| (2) | ii | iv | i | iii |
| (3) | i | iv | ii | iii |
| (4) | ii | iii | i | iv |

---

72. राज्यघटनेतील कलम 15(5) अंतर्गत खाजगी शैक्षणिक संस्थांमध्ये आरक्षण लागू करण्याची तरतूद कोणत्या घटना दुरुस्तीने करण्यात आली?

(1) 81 वी घटनादुरुस्ती
(2) 86 वी घटनादुरुस्ती
(3) 91 वी घटनादुरुस्ती
(4) 93 वी घटनादुरुस्ती



चाणक्य मंडल परिवार

73. केशवानंद भारती विरुद्ध केरळ राज्य (1973) या खटल्यासंदर्भात अयोग्य विधान/ने ओळखा.

(अ) केशवानंद भारती यांच्या बाजूने नानी पालखीवाला, फली नरिमन आणि सोली सोराबजी यांनी युक्तिवाद मांडला तर प्रतिवाद हा एस एम सिरवई यांनी मांडला.

(ब) सर्वोच्च न्यायालयाने ए.के. गोपालन खटल्यातील निर्णय बदलला आणि 24 व्या घटनादुरुस्तीची वैधता मान्य केली.

(क) सरन्यायाधीश एस एम सिक्री यांनी निकालात **राज्यघटनेचे मूळ संरचना** असा शब्द वापरला.

(1) अ, ब
(2) ब, क
(3) अ, क
(4) वरीलपैकी सर्व

---

74. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसंदर्भात (NRGES) खालीलपैकी अयोग्य विधान ओळखा.

(1) ही योजना ग्रामीण विकास मंत्रालयाद्वारे राबवली जाते.
(2) मजुरीसाठीचे 100% योगदान केंद्राचे असते तर बेरोजगारी भत्ता 100% राज्य पुरस्कृत असतो.
(3) नोंदणीनंतर 15 दिवसांच्या आत व पाच किलोमीटरच्या आत काम देणे बंधनकारक आहे.
(4) वरील पैकी एकही नाही.

---

75. माहितीच्या अधिकारासंदर्भात खालीलपैकी अयोग्य विधान/ने ओळखा

(अ) राज्यघटनेच्या कलम 21 मध्ये माहितीच्या अधिकाराचा समावेश होतो.

(ब) भारतात 1990 मध्ये पी.बी. सावंत यांच्या नेतृत्वाखाली माहिती अधिकारासंबंधीची चळवळ उभी राहिली.

(क) 1997 मध्ये माहितीच्या अधिकारासाठी स्वतंत्र कायदा करणारे तामिळनाडू हे पहिले राज्य ठरले.

(1) अ, ब
(2) अ, क
(3) फक्त क
(4) वरीलपैकी सर्व

---

76. राज्यघटनेतील खालीलपैकी कोणत्या विषयांमध्ये दुरुस्ती करण्यासाठी संसदेच्या विशेष बहुमतासोबत निम्म्यापेक्षा अधिक राज्यांच्या संमतीची आवश्यकता असते?

(अ) राष्ट्रपती निवडणूक व निवडणुकीची प्रक्रिया पद्धती.

(ब) सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या.

(क) मूलभूत हक्क

(ड) सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयासंबंधी तरतूदी

(1) अ, क, ड
(2) अ, ब, ड
(3) अ, ड
(4) वरीलपैकी सर्व

77. घटनेतील कलम 21(A) संदर्भात खालीलपैकी अयोग्य विधान ओळखा.

(1) हे कलम 86 वी घटना दुरुस्ती कायदा 2003 नुसार राज्य घटनेत समाविष्ट केले गेले.
(2) या कलमानुसार केवळ प्राथमिक शिक्षण हा मूलभूत हक्क आहे.
(3) सरकारने या घटनादुरुस्तीचा उल्लेख नागरिकांच्या हक्कांच्या संदर्भात हा दुसऱ्या क्रांतीचा उदय आहे असा केला.
(4) वरीलपैकी सर्व बरोबर.

---

78. खालीलपैकी कोणता मूलभूत हक्क फक्त भारतीय नागरिकांना उपलब्ध नसून परकीय नागरिकांना देखील उपलब्ध आहे?

(1) अल्पसंख्याकांचे भाषा लिपी व संस्कृती यांचे संरक्षण करण्याचा हक्क.
(2) सार्वजनिक नोकऱ्यांमध्ये समान संधी.
(3) प्राथमिक शिक्षणाचा हक्क.
(4) शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा व त्यांचे प्रशासन चालवण्याचा अल्पसंख्याकांचा हक्क.

---

79. मूलभूत कर्तव्यासंदर्भात खालीलपैकी योग्य विधाने ओळखा.

(अ) मूलभूत कर्तव्यांची (Fundamental Duties) अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिलेख (Writs) वापर केला जाऊ शकतो.
(ब) मूलभूत कर्तव्य फक्त भारतीय नागरिकांनाच लागू होतात.

(1) अ बरोबर (2) ब बरोबर
(3) दोन्ही बरोबर (4) दोन्ही चूक

---

80. मूलभूत कर्तव्यांमध्ये (Fundamental Duties) काही नागरी कर्तव्ये (Civic Duties) तर काही नैतिक कर्तव्ये (Moral Duties) आहेत त्या संदर्भात खालील विधानांचा विचार करा.

(अ) स्वातंत्र्य लढ्यातून निर्माण झालेल्या आदर्शांचा अभिमान बाळगणे हे नैतिक कर्तव्य आहे.
(ब) घटनेचा, राष्ट्रध्वजाचा व राष्ट्रगीताचा आदर करणे हे नागरी कर्तव्य आहे.

(1) अ योग्य ब अयोग्य (2) अ अयोग्य, ब योग्य
(3) दोन्ही अयोग्य (4) दोन्ही योग्य

---

81. राज्यघटनेतील कलम 18 संबंधी योग्य विधाने ओळखा

(अ) भारतातील नागरिक परराष्ट्राकडून कोणतीही पदवी स्वीकारणार नाही.
(ब) लाभाचे पद (Office of Profit) धारण करणारी परदेशी व्यक्ती राष्ट्रपतींच्या संमतीशिवाय परराष्ट्रांकडून पदवी स्वीकारू शकत नाही.
(क) बालाजी राघवन विरुद्ध भारतीय संघराज्य (1996) या खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने भारतरत्न, पद्मविभूषण, पद्मभूषण, पद्मश्री या पदव्या घटनात्मकदृष्ट्या वैध आहेत असे सांगितले.

(1) अ, ब (2) ब, क
(3) अ, क (4) वरीलपैकी सर्व

82.

(अ) 65 वा घटनादुरुस्ती अधिनियम 1990 नुसार अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींसाठी राष्ट्रीय आयोग अस्तित्वात आला.

(ब) 89 वी घटनादुरुस्ती कायद्याने 2003 अनुसूचित जमातींसाठी वेगळा राष्ट्रीय आयोग स्थापन करण्यात आला.

खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.

(1) अ योग्य
(2) ब योग्य
(3) दोन्ही योग्य
(4) दोन्ही अयोग्य

---

83.

(अ) अनुसूचित जमातींच्या कल्याणासाठी 2003 मध्ये आदिवासी कामकाज मंत्रालय (Ministry of Tribal Affairs) हे नवे मंत्रालय सुरू करण्यात आले.

(ब) तोपर्यंत अनुसूचित जमातींच्या संदर्भातील कामकाज हे केंद्रीय गृह मंत्रालयाच्या कार्यक्षेत्राचा भाग होते.

खालीलपैकी योग्य पर्याय ओळखा.

(1) फक्त अ योग्य
(2) फक्त ब योग्य
(3) दोन्ही योग्य
(4) दोन्ही अयोग्य

---

84. खालील आंतरराज्य जलविवाद न्यायाधिकरणांचा (Inter-State Water Dispute) स्थापनेप्रमाणे क्रम लावा.

(अ) कावेरी जल विवाद न्यायाधिकरण

(ब) नर्मदा जल विवाद न्यायाधिकरण

(क) वंसधारा जलविवाद न्यायाधिकरण

(ड) रावी व बियास जलविवाद न्यायाधिकरण

(1) अ, ड, ब, क
(2) ब, ड, अ, क
(3) ब, अ, ड, क
(4) अ, ब, क, ड

---

85. केंद्रीय माहिती आयोगासंदर्भात योग्य विधाने ओळखा. (Central Information Commission)

(अ) आयोगामध्ये मुख्य माहिती आयुक्त आणि दहापेक्षा जास्त नसतील एवढे माहिती आयुक्त असतात.

(ब) त्यांची निवड राष्ट्रपती निवड समितीच्या शिफारसी नुसार करतात.

(क) निवड समितीमध्ये पंतप्रधान हे अध्यक्ष असतात तर लोकसभेतील विरोधी पक्षनेते व पंतप्रधानांनी नेमलेले एक कॅबिनेट मंत्री हे सदस्य असतात.

(1) अ, ब
(2) ब, क
(3) फक्त ब
(4) वरीलपैकी सर्व



चाणक्य मंडल परिवार

86. घटना समितीतील दुय्यम समित्यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| **समिती** | **अध्यक्ष** |
|---|---|
| (अ) सर्वोच्च न्यायालयाबाबत समिती | (i) एस. वरदाचारी |
| (ब) वृत्तपत्र कक्ष समिती | (ii) डॉ. के. एम. मुन्शी |
| (क) घटनेतील आर्थिक तरतूदींविषयक समिती | (iii) नलिनी रंजन सरकार |
| (ड) कामकाज क्रम समिती | (iv) उषा नाथ सेन |

| | (अ) | (ब) | (क) | (ड) |
|---|---|---|---|---|
| (1) | i | iii | iv | ii |
| (2) | ii | iv | iii | i |
| (3) | i | iv | iii | ii |
| (4) | ii | iii | iv | i |

---

87. घटना समिती (Constitutent Assembly) संदर्भात खालीलपैकी योग्य विधान/ने ओळखा.

(अ) घटना समितीमध्ये केवळ दोनच पक्षांचे एकहून अधिक सदस्य होते.

(ब) भारतीय प्रांतांमधील (Indian Provinces) सर्वात जास्त सदस्य हे संयुक्त प्रांतातील होते.

(क) भारतीय संस्थानातील (Princely States) सर्वाधिक सदस्य हे म्हैसूरचे होते.

(1) अ, ब
(2) फक्त ब
(3) ब, क
(4) वरीलपैकी सर्व

---

88. भारतीय राज्यघटनेचा स्त्रोतांसंदर्भात योग्य जोडी ओळखा.

(1) आयर्लंडची राज्यघटना - राज्यसभेच्या सदस्यांची निवडणूक
(2) जर्मनीच्या वायमार प्रजासत्ताकाची राज्यघटना - आणीबाणीसंबंधी तरतुदी
(3) ऑस्ट्रेलियाची राज्यघटना - समवर्ती सूची (Concurrent List)
(4) दक्षिण आफ्रिकेची राज्यघटना - राज्यसभेत सदस्य नामनिर्देशित करणे

---

89. संपत्तीच्या अधिकाराच्या संदर्भात खालीलपैकी योग्य विधाने ओळखा.

(अ) सुरुवातीला संपत्तीचा अधिकार राज्यघटनेच्या कलम 19(1)(एफ) आणि कलम 31 नुसार प्रदान केला गेला होता

(ब) 42 व्या घटनादुरुस्तीनुसार कायदा 1976 ने संपत्तीच्या अधिकाराला मूलभूत हक्कांमधून वगळले.

(क) आता खासगी संपत्तीला कार्यकारी कृती (Executive Action) पासून संरक्षण आहे परंतु वैधानिक कृतीपासून (Legislative Action) नाही.

(ड) आता राज्याने खासगी मालमत्तेचे अधिग्रहण (Acquisition) केल्यास नुकसान भरपाईच्या हक्काची हमी नाही.

(1) अ, क, ड
(2) अ, ब, क
(3) ब, क
(4) क, ड



चाणक्य मंडल परिवार

90. निवडणूक आयोगासंदर्भात खालीलपैकी योग्य विधान/ने ओळखा.

(अ) राज्यघटनेच्या कलम 324 नुसार निवडणूक आयुक्तांचा कार्यकाळ 6 वर्षे किंवा वयाची 65 वर्षे होईपर्यंत यापैकी जे अगोदर पूर्ण होईल तोपर्यंत असतो.

(ब) मुख्य निवडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्त यांना समान अधिकार असतात.

(1) फक्त अ (2) फक्त ब
(3) दोन्ही योग्य (4) दोन्ही अयोग्य

91. संघ लोकसेवा आयोगासंदर्भात (Union Public Service Commission) अयोग्य विधान/ने ओळखा.

(अ) आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य पुनर्नियुक्तीस पात्र नसतात.

(ब) राष्ट्रपती संघ लोकसेवा आयोगाच्या कार्यक्षेत्रातून सेवा, पदे किंवा इतर बाबी वगळू शकतो.

(क) राष्ट्रपती संघ लोकसेवा आयोगाच्या अधिकार क्षेत्राचा विस्तार करू शकतात.

(1) अ, ब (2) ब, क
(3) अ, क (4) फक्त अ

92.

(अ) राज्य लोकसेवा आयोगाच्या (State Public Service Commission) सदस्यांची नियुक्ती हे राज्यपाल करतात परंतु आयोगाच्या सदस्य संख्या ठरवण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असतो.

(ब) नादारी (Insolvency) अथवा दिवाळखोरी (Bankruptcy) या कारणांवरून सदस्यास पदच्युत (Removal) करायचे असल्यास राष्ट्रपती संबंधित सदस्याची सर्वोच्च न्यायालयाला कळवतात.

खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.

(1) अ योग्य
(2) ब योग्य
(3) दोन्ही योग्य
(4) दोन्ही अयोग्य

93. राष्ट्रीय महिला आयोगासंदर्भात (National Commission for Women) खालीलपैकी अचूक विधान/ने ओळखा.

(अ) राष्ट्रीय महिला आयोग कायदा 1992 नुसार आयोगाची स्थापना करण्यात आली.

(ब) आयोगामध्ये एक अध्यक्ष आणि पाच सदस्य असतात.

(क) अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती राष्ट्रपती द्वारा केली जाते.

(ड) आयोगाला दिवाणी कोर्टाचे (Civil Court) अधिकार आहेत.

(1) अ, ब, ड (2) ब, क, ड
(3) ब, ड (4) वरीलपैकी सर्व



चाणक्य मंडल परिवार

94. राष्ट्रीय मानवी हक्क आयोगासंदर्भात खालील विधानांचा विचार करा.

(अ) आयोगामध्ये एक अध्यक्ष, पाच पूर्णवेळ सदस्य (Full Time Members) आणि सहा पदसिद्ध सदस्य (ex-officio members) असतात.

(ब) अध्यक्षपदासाठी सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश असणारी व्यक्तीच पात्र असते.

(क) राष्ट्रपती सहा सदस्यीय समितीच्या शिफारशीवरून अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करतात.

(ड) अध्यक्ष व सदस्य पुनर्नेमणुकीसाठी पात्र असतात.

वरीलपैकी अयोग्य नसलेले विधान/ने ओळखा

(1) अ, ब, क
(2) अ, क, ड
(3) क, ड
(4) वरीलपैकी सर्व

95.

(अ) राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगामध्ये एक अध्यक्ष व पाच सदस्य असे एकूण सहा लोक असतात.

(ब) राष्ट्रपती निवड समितीच्या शिफारशीवरून त्यांची नियुक्ती करतात.

(क) आयोगाने आत्तापर्यंत सहा समुदायांना अल्पसंख्यांक समुदाय म्हणून सूचित केले आहे.

खालीलपैकी योग्य पर्याय ओळखा.

(1) अ चूक, ब, क बरोबर
(2) अ, ब चूक क बरोबर
(3) ब, क चूक, अ बरोबर
(4) वरीलपैकी सर्व बरोबर

96.

(अ) महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाची स्थापना 6 मार्च 1994 रोजी झाली.

(ब) आयोगामध्ये एक अध्यक्ष व चार सदस्य यांचा समावेश असतो.

(क) महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाकडे तक्रार करण्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजी व गुजराती या चार भाषांचा वापर केला जाऊ शकतो.

वरीलपैकी योग्य विधान/ने ओळखा.

(1) अ, ब
(2) ब, क
(3) अ, क
(4) वरीलपैकी सर्व

97. ज्यांची अंमलबजावणी करवून घेण्याची उपाय योजना अस्तित्वात नसेल, असे हक्क पाण्यावर लिहिल्याप्रमाणे असतात. न्यायालयास पुनर्विलोकनाचे अधिकार प्राप्त नसल्यास नियंत्रित राज्यघटना अनियंत्रित होईल. वरील निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने कोणत्या खटल्यामध्ये मांडले?

(1) केशवानंद भारती खटला (1973)
(2) मिनर्व्हा मिल्स खटला (1980)
(3) मद्रास राज्य वि. व्हि. जी. राव खटला (1952)
(4) इंदिरा नेहरू-गांधी वि. राज नारायण खटला (1975)

98. कलम 14, कलम 19 व कलम 21 यांना सुवर्ण त्रिकोण (Golden Triangle) म्हणतात. ही तिन्ही कलमे एकमेकांशी अंतर संबंधित आहे. असे सर्वोच्च न्यायालयाने कोणत्या खटल्यामध्ये म्हटले आहे?

(1) एस आर बोम्मई वि. भारतीय संघराज्य (1994)
(2) वामनराव वि. भारतीय संघराज्य (1981)
(3) मनेका गांधी वि. भारतीय संघराज्य (1978)
(4) मिनर्व्हा मिल्स वि. भारतीय संघराज्य (1980)

---

99. सर्वोच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या पदच्युती संदर्भात खालील विधानांचा विचार करा.

(अ) सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांना राष्ट्रपतीच्या आदेशाने पदच्युत करता येते.

(ब) संसदेने अशा पदच्युतीसाठी निवेदन त्याचा अधिवेशनात राष्ट्रपतीला सादर केल्यावर राष्ट्रपती पदच्युतीचा आदेश काढू शकतात.

(क) लोकसभा विसर्जित झाल्यास न्यायाधिशांवर महाभियोग (impeachment) चालवून पदच्युत करण्याचा प्रस्ताव लोप पावतो.

वरीलपैकी योग्य विधाने ओळखा.

(1) अ, ब
(2) ब, क
(3) अ, क
(4) वरीलपैकी सर्व

---

100. राज्यघटनेतील कलम 19 अंतर्गत प्राप्त अधिकार व त्यांवरील मर्यादा यांच्या अयोग्य जोड्या ओळखा.

| **अधिकार** | **मर्यादा** |
|---|---|
| (अ) भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्य | भारताचे सार्वभौमत्व व अखंडता, संरक्षण, सर्वसाधारण जनतेचे हित. |
| (ब) शांततापूर्वक निःशस्त्र सभा भरविण्याचा अधिकार | देशाचे सार्वभौमत्व व एकात्मता |
| (क) भारतीय प्रदेशात मुक्तसंचाराचे स्वातंत्र्य | देशाचे सार्वभौमत्व व एकात्मता |
| (ड) वास्तव्याचे स्वातंत्र्य | सर्वसाधारण जनतेचे हित, सुव्यवस्था व नैतिकता |

(1) अ, क, ड
(2) ब, क, ड
(3) क, ड
(4) वरीलपैकी एकही नाही

---